पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• वर्ष १ ले • अंक : २ • ऑक्टोबर २००७ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org


## मा. महापौर यांच्या शुभ हस्ते कल्याणवार्ताच्या प्रथम अंकाचे प्रकाशन



कल्याणवार्ता प्रथम अंक सप्टेंबर, ०७ चे प्रकाशन करताना मा. महापौर

कल्याणवार्ता सप्टेंबर २००७ च्या अंकाचे प्रकाशन मा. महापौर यांच्या शुभ हस्ते दिनांक २८/०९/२००७ रोजी त्यांच्या दालनात झाले. प्रकाशन कार्यक्रमाच्या वेळी कल्याणवार्ताचे संपादक तथा सल्लागार (कामगार) श्री. नंदकिशोर जगताप, कार्यकारी संपादक श्री. लीलाधर वाबळे, अधिकारी श्री. शिवाजी दौंडकर व श्री. अरुण खिलारी, व्यवस्थापक (प्रेस) श्री. जयंत पवार, पुणे मनपा एम्प्लॉईज युनियनचे कार्याध्यक्ष श्री. प्रकाश जाधव, पीएमसी एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष श्री. तुकाराम जगताप, श्री. पानसे व अन्य युनियनचे पदाधिकारी, अधिकारी व सेवक उपस्थित होते.

## मनपा सेवक व पाल्यांचे विशेष सत्कार

मा. अक्कुरशेठ कुदळे, अध्यक्ष, विधी समिती यांच्या हस्ते खालील विशेष सत्कारार्थींचा सन्मान करण्यात आला.

१. अग्निशामक दलातील सब ऑफिसर भिमराव एकनाथ पवार व तांडेल श्री. भाउ शिंदे यांना उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पदकाने स्वातंत्र्यदिनी गौरव करण्यात आल्याप्रित्यर्थ.

२. मनपातील सेवक श्री.प्रवीण व सौ. सीमा बारवकर यांचे चिरंजीव कुमार आदित्य बारवकर या आठवीतील व वय वर्षे १३ असलेल्या विद्यार्थ्याने एमएससीआयटी या परीक्षेमध्ये ९२% मार्क मिळवून प्राविण्य संपादन केल्याप्रित्यर्थ.

३. मनपा सेवक रमेश शेलार यांची मुलगी चि. निधी रमेश शेलार, वय वर्षे १३ हिने भागिरथी नदीमध्ये ८१ कि.मी. अंतर १२ तास २८ मि. पोहून पूर्ण करुन रेकॉर्ड ब्रेक केल्याप्रित्यर्थ.

## ध्येयवाक्य व बोधचिन्ह स्पर्धा

पुणे मनपाच्या प्रज्ञावंत व प्रतिभावान कलाकार अधिकारी व सेवक यांच्यासाठी कामगार कल्याण निधीसाठी ध्येयवाक्य व बोधचिन्ह स्पर्धा आयोजित केली आहे. स्पर्धकास कमाल तीन ध्येयवाक्ये व बोधचिन्हे सुचविता येतील. अंतिम निवड केलेल्या ध्येयवाक्य व बोधचिन्हासाठी प्रत्येकी रु.१००१/ चे पारितोषिक कामगार कल्याण निधीतून प्रदान करण्यात येईल.

स्पर्धेच्या अटी,शर्तींचे माहितीपत्र सल्लागार (कामगार) कार्यालयाकडून दिनांक ०१/११/०७ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येईल.अधिक माहितीसाठी मनुष्यबळ विकासाचे समन्वयक श्री.वाबळे यांच्याशी दूरध्वनी क्र.२५५०१२५५ संपर्क साधावा.

## संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानांतर्गत बिबवेवाडी व येरवडा क्षेत्रीय कार्यालयास प्रथम व द्वितीय पुरस्कार

संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान सन २००५-०६ चे परीक्षण समितीने बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयास प्रथम क्रमांकाचा रु. ५.०० लक्षचा पुरस्कार तर येरवडा क्षेत्रीय कार्यालयास रु. ३.०० लक्षचा पुरस्कार मा. डॉ. नितीन करीर, विभागीय आयुक्त यांच्या शुभ हस्ते दिनांक २९/९/२००७ रोजी विधानभवन, पुणे येथे आयोजित विशेष समारंभात प्रदान करण्यात आला.

संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानांतर्गत बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयाने त्यांचे नियंत्रणाखालील वॉर्ड्समध्ये विविध नवीन उपक्रम सुरु केले. यामध्ये होकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी मोकादम सेवकांना प्रशिक्षण, बिबवेवाडी परिसरातील नागरिकांची सभा घेवून त्यांना ओला/सुका कचरा वेगळा करणे व गांडुळ खत प्रकल्पाबाबत माहिती देवून स्वच्छता अभियानामध्ये सहभाग करुन घेण्यात आला. घरोघरी कचरा उचलण्यासाठी घंटा गाड्या पाठविण्यात आल्या, बिबवेवाडी गाव, प्रभाग क्र. ४४ हा कंटेनरविरहित करण्यात आला.



पुरस्कार प्रदान करताना मा. डॉ. नितीन करीर, विभागीय आयुक्त, पुणे समवेत उपायुक्त मा. विलास कानडे, क्षेत्रिय अधिकारी मा. अनिल जगताप, वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभांगी शहा व मनपा सेवक

कागद, काच, पत्रा संघटनेच्या कार्यकर्त्यांना सायकल रिक्शा उपलब्ध करुन देण्यात आल्या. १९ सुलभ शौचालयाद्वारे वार्डामध्ये स्वच्छता निर्माण करण्यात आली. मोठ्या प्रमाणावर भांडवली कामे व महसुली कामे हाती घेण्यात आली. नागरिकांच्या तक्रारींची तात्काळ दखल घेवून त्या सोडविण्याचा मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केला. तसेच, येरवडा क्षेत्रीय कार्यालयाने सुध्दा या अभियानामध्ये विविध कार्यक्रम व उपक्रम राबविले. दोन्ही क्षेत्रीय कार्यालयांच्या अधिकारी व सेवकांच्या अथक परिश्रमातून हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

या सर्व बाबींची दखल या पुरस्काराच्या वेळी परीक्षण समितीने घेतली आहे. या पुरस्काराच्या वेळी मा. श्री. विलास कानडे, उप आयुक्त, विभागीय कार्यालय क्र. ४, श्री. अनिल जगताप, क्षेत्रीय अधिकारी, डॉ. शुभांगी शहा, वैद्यकीय अधिकारी, बिबवेवाडी, येरवडा प्रभाग समितीचे अध्यक्ष, मा. श्री. ज्ञानेश्वर शिंदे, मा.श्री. भानुदास माने, उप आयुक्त, विभागीय कार्यालय क्र.२, श्री. विजय दहिभाते, क्षेत्रीय अधिकारी, डॉ. लबडे, वैद्यकीय अधिकारी, येरवडा क्षेत्रीय कार्यालय व बिबवेवाडी व येरवडा क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व सेवक बहुसंख्येने उपस्थित होते.

## आवाहन

### मनुष्यबळ विकास सूचना,संकल्पना

मनुष्यबळ विकासाबाबत आपल्या सूचना, संकल्पना यांचे विशेष स्वागत आहे. यासाठी मनुष्यबळ विकासाचे समन्वयक श्री. लीलाधर वाबळे यांच्याशी दूरध्वनी क्र.२५५०१२५५ संपर्क साधा.

## दीपावली २००७ हार्दिक शुभेच्छा



**दीपावली व नुतन वर्षे सर्वांना आनंदाचे, समाधानाचे व भरभराटीचे जावो, ही सदिच्छा !**

**संपादक**

## कल्याण निधीची नोंदणी

मनपा कामगार कल्याण निधीची नोंदणी, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये करण्यात आली आहे. (नोंदणी क्र १७१५/२००७/पुणे, दि.१९/१०/०७ असा आहे)

## कल्याणवार्ता वेबसाईटवर

मा. महापालिका आयुक्त यांनी प्रथम अंकासाठी दिलेल्या संदेशामध्ये सूचित केल्यानुसार कल्याणवार्ता सप्टेंबर ०७ चा अंक पुणे मनपाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

या पुढील सर्व अंक मनपाच्या www.punecorporation.org वेबसाईटवर उपलब्ध असणार आहेत.

संपादकीय...

# वरं जनहितं ध्येयम्...

पुणे मनपा भवनाच्या दर्शनी भागावर वरं जनहितं ध्येयम हे ध्येयवाक्य आपण अनेक वेळा पाहिले आहे.स्थानिक स्वराज्य स्वायत्त संस्था म्हणून मनपाचे वेगळे स्थान आहे.प्रत्येक राष्ट्राची ओळख जशी राष्ट्राचं नाव,राष्ट्रध्वज,राष्ट्रगीत,राष्ट्राचं ध्येयवाक्य,इत्यादीमुळे चटकन होते.तसंच एखाद्या संस्थेची ओळख त्याच्या ध्येयवाक्यामुळे सर्वांना ज्ञात होते.संस्थेच्या कार्याचे खरे प्रतिबिंब संस्थेच्या ध्येयवाक्यात लोकांना दिसत असते.आपल्या संस्थेचं ध्येयवाक्य म्हणजे आपणा सर्वांचे ते ध्येयवाक्य आहे.जनहित हेच आमचे अंतिम ध्येय आहे आणि ज्या कार्यात केवळ जनहित आहे,अशी कार्येच हाती घेतली जातात असा ध्येयवाक्याचा सरळ व साधा अर्थ आहे.अल्पकालीन लाभ विचारात न घेता दीर्घकालीन शाश्वत हित साधणारी कार्ये करणे. शहरवासियांना उत्तम नागरी सुविधा पुरविणे हेच उद्दिष्ट प्रतिबिंबित होत आहे.जनता वा नागरिक हे आपले ग्राहक आहेत व त्यांच्यासाठी आपण आहोत,ही भावना ठेवून केलेले कार्य जनहिताचेच आहे.या जनहिताच्या ध्येयाच्या व्याप्तीमध्ये दिवसेदिवस कितीही विस्तार झाला तरी त्याच्या मूलभूत संकल्पनेत वा चौकटीत कधीही बदल होणार नाही.जनतेचे शासन हे जनतेच्या कल्याणासाठीच असले पाहिजे.वरं याचा अर्थ केवळ वा श्रेष्ठ असा आहे.म्हणजे केवळ श्रेष्ठ अशा जनहिताला या संस्थेमध्ये सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे असा त्याचा अर्थ आहे. या कार्यामध्ये जनस्तुतीकडे लक्ष न देता व्यापक अर्थाने जनहित साधायचं हा त्यातील मूळ गाभा आहे.ध्येयवाक्य वा ध्येयाची काही आवश्यकता आहे का याचा आपण विचार केला तर प्रत्येकाच्या जीवनाचा आधार ध्येय आहे त्यामुळे लहान मुलांपासून वृध्दांपर्यंत सर्वांची काही ना काही ध्येय असतात व ती गाठण्यासाठी प्रत्येकजण आपापल्या परीने व आपापल्या क्षमते व परिस्थितीच्या उपलब्धतेनुसार आटोकाट प्रयत्न करीत असतो.

या ध्येयाच्या पूर्तीसाठी कायदे,नियम,उपनियम,स्थायी आदेश,धोरण,निर्णय असे बाह्य मदतनीस संस्थेमध्ये निर्माण केले जातात.परंतु प्रत्येक वेळेला मूळ ध्येयाचा विसर पडू न देता वरील सर्व सहाय्यकारी बाबींचा विवेकपूर्ण वापर करणे आवश्यक असते. जागतिकीकरण,उदारीकरण व खाजगीकरण या तिन्हींचा रेटा मोठ्या प्रमाणात असल्याने जबरदस्त स्पर्धेचा काळ आला आहे.जनांच्या अपेक्षा मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत.त्या अपेक्षा अगदी योग्य आहेत.पण त्या पूर्ण करण्यासाठी साधनसामग्री,पैसा,श्रम या मूलभूत घटकांचा मोठ्या प्रमाणावर नितांत आवश्यकता आहे.या ध्येयरुपी जगन्नाथाचा रथ ओढण्यासाठी त्यातील प्रत्येक घटकाने आपला किमान खारीचा वाटा उचलला पाहिजे.आपल्या जीवनातून आपली संस्था वगळली तर हाती काहीच राहात नाही.याचा आपण सदोदित विचार केला पाहिजे.आपला सामाजिक दर्जा,राहणीमानाचा स्तर,सामाजिक व कौटुंबिक स्वास्थ्य व श्रेणीवाढ, इत्यादी गोष्टी केवळ संस्थेतील रोजगारामुळे व या संस्थेतील आपल्या अस्तित्वामुळे प्राप्त होत आहे.त्यामुळे संस्थेच्या ध्येयाशी आपल्या प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ कृतीद्वारे बांधिलकी स्विकारलेली असते.त्यातूनच आपण पुणे शहरातील ३०-३५ लाख शहरवासियांना उत्तम दर्जाच्या नागरी सुविधा देण्यास कटीबध्द राहणे नितांत गरजेचे आहे.भारतीय संस्कृतीमध्ये ध्येयाला उच्च स्थान आहे.ध्येयासाठी सर्वस्वाचे समर्पण करणाऱ्या महान विभूती भारतामध्ये होवून गेल्या आहेत.संस्थेच्या ध्येयासाठी पराकाष्ठा करणे म्हणजेच संस्थेवरील निष्ठा होय. संस्थेकडून आपण काही अपेक्षा करतो त्यावेळी आपण संस्थेसाठी काय करतो हे अत्यंत महत्वाचे ठरते.मी माझे काम प्रामाणिकपणे, कौशल्याने व कार्यक्षमतेनं केलं की जनहित आपोआपच साधेल इतका साधा ध्येयाचा आपल्यापुरता अर्थ आहे.

जीवनात तत्वनिष्ठेला सर्वोच्च स्थान आहे.तत्वहीन जीवन मग ते व्यक्ति वा संस्थेचे असो,त्याचा शेवट त्याच्या ऱ्हासात होतो.मानसशास्त्र,नितीशास्त्र व अध्यात्मशास्त्राच्या निश्चित शास्त्रीय चौकटीत ध्येय येते.या ध्येयाची पूर्तता करण्यासाठी आपण काय करु शकतो याचे आत्मपरीक्षण केल्यास अनेक सुधारणा व नवनवीन मार्ग सापडतील.आपल्या कार्यातून संस्थेची प्रतिभा व प्रतिमा वृध्दिंगत व दैदिप्यमान होईल.आपले कार्य अधिक सुलभ व कार्यक्षम व्हावे यासाठी संस्था काळानुरुप आधुनिक साधनसामग्री, यंत्रसामग्री,तंत्रज्ञान उपलब्ध करुन देते.याचा यथार्थ लाभ व्यापक जनहित साधण्यासाठी काया,वाचा व मनाने करण्यास आपण सर्वजण कटीबध्द आहोतच, त्याची गती वाढवू या.

**वरं जनहितं ध्येयम्** या ध्येयवाक्याशी आपल्या बांधिलकीचे सतत स्मरण ठेवून आपली जबाबदारी व कर्तव्ये हे कोणी सांगण्याची वाट न पहाता गतीने पूर्ण करुया.

# गुणवंत मनपा सेवकांच्या पाल्यांचा सत्कार



**कार्यक्रम प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांच्या समवेत प्रमुख पाहुणे डॉ. श्रीधर चितळे, स्थायी समिती अध्यक्ष मा. बापूसाहेब पठारे, मा. सुनिल बनकर, मनपा अधिकारी, युनियन पदाधिकारी व सेवक**

कामगार कल्याण निधीमार्फत माध्यमिक/उच्च माध्यमिक परीक्षेमध्ये उच्च यश संपादन केलेल्या अधिकारी सेवकांचे पाल्य आणि श्री. खेतमाळीस, सि.ग्रे.लेखनिक यांचा मुलगा आयएएस झाल्याप्रित्यर्थ विशेष सत्कार सोमवार दि.६/८/०७ रोजी छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केला होता.कार्यक्रम मा. बापूसाहेब पठारे, अध्यक्ष स्थायी समिती यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे डॉ.श्रीधर चितळे, प्राचार्य, फर्ग्युसन महाविद्यालय यांचे उपस्थितीत आयोजित केला होता.

या प्रसंगी मा. सुनिल बनकर, सदस्य, पुणे मनपा, मा. मोहन अडतानी, अति.आयुक्त(ज), मा. डामसे, उप आयुक्त, मनपा युनियनचे कार्याध्यक्ष श्री. प्रकाश जाधव, सल्लागार (कामगार) मा. नंदकिशोर जगताप, कामगार कल्याणाधिकारी श्री. शिवाजी दौंडकर व श्री. अरुण खिलारी हे उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात डॉ. चितळे यांनी दहावी व बारावीनंतर "उपलब्ध शैक्षणिक आणि व्यावसायिक संधी व पर्याय" या विषयावर उपस्थित सत्कारार्थी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सुसंवाद साधला. तदनंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

बारावी उत्तीर्ण यशस्वी विद्यार्थ्यांना द अल केमिस्ट, अत्यंत प्रतिभावान मुलांची सात वैशिष्ट्ये व चालु घडामोडी २००७ अशी तीन पुस्तके तर दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना संगणक भरारी व युवा विज्ञान कुतुहल भाग १ व २ अशी प्रत्येकी तीन पुस्तके सप्रेम भेट देण्यात आली.

७५% पेक्षा जास्त मार्क मिळालेल्या व दहावी/बारावीच्या अनुक्रमे ४२ व ३ अशा एकूण ४५ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

मनपातील महात्मा फुले विद्यालयात काम करणारे श्री. खेतमाळीस पांडुरंग मनाजी यांचे चिरंजीव श्री. मकरंद पांडुरंग खेतमाळीस यांनी २००६ मध्ये युपीएससीच्या दिलेल्या परीक्षेमध्ये आयएएस केडरमध्ये राष्ट्रीय/राज्य स्तरावर अनुक्रमे ११९ आणि ६ वा क्रमांक प्राप्त करुन उज्वल यश संपादन केले. आयएएसच्या एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी १८ ऑगस्ट, ०७ पासून मसुरी येथे ते जॉईन झाले आहेत. या कार्यक्रमामध्ये त्यांचा सत्कार पालकांसह करण्यात आला.

सत्कारार्थींच्या वतीने श्री. मकरंद खेतमाळीस यांनी आयएएस क्रेडरमध्ये जावून देशाची सेवा करण्याची करण्याची संधी विद्यार्थ्यांनी घ्यावी, आयएएस क्रेडरसाठी संघटन व अंगिकृत कौशल्य यांचे मुल्यवर्धन व नैतिक मुल्यांची जपणूक करणे आवश्यक आहे, असा स्वत:च्या मनोगतात बहुमोल सल्ला दिला. डॉ. चितळे यांनी केलेल्या मार्गदर्शनात शिक्षण क्षेत्रातील सत्य अनुभव कथन केले. प्रत्येक विद्यार्थ्याने शाखेची आवडीप्रमाणे निवड करावी.

जीवनात Security, Success & Satisfaction (3-S) या त्रिसूत्रीचे पालन करावे. समुपदेशाचा विद्यार्थ्याच्या जीवनात चांगला परिणाम होतो हे त्यांना आलेल्या अनुभवाधारे विद्यार्थ्यांना समजून सांगितले.

आयुष्यात विद्यार्थ्यांनी तणावाबरोबर जगणं योग्य व आवश्यक आहे. तणाव नकोच अशी अपेक्षा बरोबर नाही. पालकांनी मुलांमध्ये तुलना करु नये, अभ्यासाला ठराविक अशी फुटपट्टी लावता येत नाही, अभ्यासाचे निकष विद्यार्थीनिहाय वेगळे असतात. शैक्षणिक निर्णय भावनात्मक नको, ते गरजेनुरुप व वास्तव स्विकारुन घ्यावेत. आयुष्यभर स्पर्धा साथीला आहे, स्पर्धा क्रमप्राप्त, अपरिहार्य आहे परंतु ती जीवघेणी नको. निकोप स्पर्धेला तोंड देण्याची तयारी ठेवावी. व्यक्तिमत्व विकासामध्ये पारदर्शकता, संभाषण कौशल्य, समुहात काम करण्याची तयारी, लेखन कौशल्य, संयोजन कौशल्य आत्मसात केले तर तो विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात मागे पडणार नाही.

आपली देशाच्या मातीशी नाळ जोडलेली आहे, त्या मातीशी ईमान राखा. पर्यायाने देशासाठी योगदान देण्याची धारणा ठेवा, असे विचार डॉ.चितळे यांनी विद्यार्थ्यांना त्यांनी मांडले. या प्रसंगी मा. पठारे, मा. जगताप यांनी त्यांच्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. लीलाधर वाबळे व आभार प्रदर्शन श्री. जयवंत शिंदे यांनी केले.

## वाचकांसाठी...

- खातेप्रमुखांच्या कार्यालयाकडून दरमहा अंक उपलब्ध करुन कार्यालयाच्या दर्शनी भागावर/सूचना फलकावर लावा.
- आपला अंक वाचून झाल्यावर दुसऱ्याला वाचण्यास द्या.
- अभिप्राय व सूचना द्या.
- नवीन स्तुत्य उपक्रम/योजना/कार्यक्रम यांचे फोटोसहित संक्षिप्त वृत्त पाठवा.
- मनपा वेबसाईटवर प्रसिध्द केलेला अंक पहा.
- अंकाबाबत अभिप्राय पाठवा.

## ज्ञानसंवर्धन

पर्यावरण म्हणजे सभोवतालचा परिसर. यात वातावरण, भूआवरण, जलावरण या अजैविक घटकांचा तसेच, जीवावरण या जैविक घटकांचा समावेश होतो.याशिवाय पर्यावरणात घरे, रस्ते, कारखाने,धरणे, पूल, वाहने, इत्यादी अनेक मनुष्यनिर्मित घटकांचाही समावेश होतो.

# सफाई कर्मचाऱ्यांना प्रायोगिक स्वरुपात मास्कचे वाटप

२ ऑक्टोबर, ०७ रोजी महात्मा गांधी जयंतीच्या दिवशी १४ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्य रक्षणासाठी तसेच काम करताना धूळ, धूर, प्रदूषण याचा त्रास होवू नये म्हणून मास्क चे वाटप करण्यात आले. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामध्ये एकूण २० सफाई कर्मचाऱ्यांना दोन प्रकारचे मास्क वापरण्यास दिले आहेत.

या वापराच्या अनुभवानंतर येणाऱ्या सूचनांची योग्य ती दखल घेवून सर्व सफाई कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी उत्तम दर्जाचे व त्यांच्या पसंतीचे मास्क वाटप करण्यात येणार आहेत.

•••



**कार्यक्रम प्रसंगी मा. मनिषाताई घाटे, अध्यक्ष, प्रभाग समिती यांचे समवेत श्री. मोरे, डॉ. कल्पना बळीवंत, मा. स्वाती मोरे, सभासद, म.न.पा., श्री. राजाभाऊ कुंभार, श्री. घोलप, श्री. गुंजीकर व सेवक**

# अभियंता दिन

पुणे महानगरपालिका अभियंता संघाचे वतीने अभियंतादिन इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्सचे हॉलमध्ये दिनांक १८/९/२००७ रोजी आयोजित केला होता. या कार्यक्रमास मा. प्रविणसिंह परदेशी, आयुक्त, पुणे मनपा. मा. दिलीप बंड, आयुक्त, पिंपरी चिंचवड मनपा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. निवृत्त झालेल्या व बढती मिळालेल्या अभियंत्यांचा आयुक्तांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कामगार कल्याण निधीकडून स्फूर्ती घेवून या वर्षीपासून गुणवंत अभियंता पुरस्कार देण्यास प्रारंभ करण्यात आला. या प्रसंगी आयुक्त, पुणे मनपा यांनी प्रत्येक अभियंता हा निर्मिती व विकासाचे काम करतो, सेवक/अधिकाऱ्यांनी केलेल्या सर्वोत्तम कामगिरीची प्रशंसा होवून त्याच्या पाठीवर प्रोत्साहनपर थाप मारणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रोत्साहन प्रत्येक वेळी आर्थिक बाबींशी निगडित असू नये, ते अन्य प्रकारे करणे शक्य आहे तथापि, ते करणे नितांत गरजेचे आहे, असे प्रतिपादन केले.

मा. दिलीप बंड, आयुक्त, पिंपरी चिंचवड मनपा यांनी पुणे शहराला व पुणे मनपाला जागतिक पातळीवर वेगळा दर्जा आहे, त्यामुळे आम्हीही नवीन पुणे असे पिंपरी चिंचवड मनपाला नाव धारण करावे , असा प्राथमिक विचार केला आहे. याचबरोबर दोन्ही मनपाने हातात हात घालून एकत्रित व सर्वसमावेशक विकास करणे ही काळाची गरज आहे, असे विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमास पुणे व पिंपरी चिंचवड मनपाचे बहुसंख्य अधिकारी, अभियंता संघाचे पदाधिकारी, श्रीमती मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन व श्री. बोरावके, पिंपरी चिंचवड मनपा अभियंता संघ हे उपस्थित होते.

प्रास्ताविक श्री. नरेंद्र वाघ यांनी व आभारप्रदर्शन संजय पोळ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. जगदीश चव्हाण व श्री. सुनिल कदम यांनी केले.

# गरजेनुरुप व सतत प्रशिक्षण योजनेंतर्गत व्याख्याने

कामगार प्रशिक्षण वर्गामध्ये पुढील व्याख्यात्यांनी विविध विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. सौ. अकल्पिता सप्रे-स्वओळखीतून स्वविकास, श्री. मधुकर बिबवे-कार्यक्षमतेवर परिणाम करणारे घटक व त्यावरील उपाय, प्रा. विजयकुमार जगताप-व्यक्तिमत्व विकास व कार्यक्षमता, श्री. ए.जी.बर्सगेकर-समूह व्यवस्थापन, डॉ. एस.जी.बापट-२१ व्या शतकातील आवाहने, डॉ. रश्मी हेबाळकर-कार्यक्षमता वृध्दी, श्री. रामटेके-उत्पादकता व त्यामध्ये कामगारांची भूमिका, डॉ. पी.पी.जोशी-कार्यनिती, श्री. भास्कर मोरे-व्यसनमुक्ती, प्रा.ए.एम.जोशी-कार्यप्रेरणा, श्री. चंद्रकांत शितोळे-मनपा सेवा विनियम, डॉ. सोनकांबळे-अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना , श्री. पांडुरंग सावंत-मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, श्री. लीलाधर वाबळे-कार्यालयीन कामकाजात संगणकाचे महत्व, श्री. अरुण खिलारी-मनपातील कामगार कल्याणकारी योजना अशी १५ व्याख्याने २३ ऑक्टोबर, २००७ पर्यंत झाली.

# सप्टेंबर, ०७ मध्ये सेवापूर्ती झालेल्या सेवकांचा निरोप-समारंभ



**कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे मा. ॲड. प्रसन्न जगताप व मा. चरवड, सदस्य पुणे मनपा यांचे समवेत मा. नंदकिशोर जगताप, श्री. अरुण खिलारी, लीलाधर वाबळे, जयवंत शिंदे, व. द. गोडबोले व अन्य सेवापूर्ती झालेले सेवक**

वर्ग १ ते ४ मधील सर्व सेवकांना त्यांच्या सेवापूर्तीप्रित्यर्थ सल्लागार (कामगार) कार्यालयाकडून निरोप समारंभ महिन्याच्या अखेरीस आयोजित केला जातो.सप्टेंबर,०७ मध्ये सेवापूर्ती झालेल्या प्रत्येक सेवकाला शाल, स्मृतिचिन्ह व गुलाबपुष्प देवून सन्मानित करण्यात आले. सप्टेंबर ०७, मध्ये ३ ऐच्छिक व १८ वयपरत्वे असे २१ निवृत्त झालेले सेवक होते. या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन्सतर्फे मनपाच्या निवृत्त सेवा संघाचे सेक्रेटरी श्री.व.द.गोडबोले यांना निवृत्त सेवा पुरस्कार प्राप्त झाल्याप्रित्यर्थ व सत्कारार्थीतर्फे व.द.गोडबोले, सुभाष घाग, रामचंद्र लिटके व वसंत कदम यांची समयोचित भाषणे झाली. सूत्रसंचालन श्री. लीलाधर वाबळे तर श्री. जयवंत शिंदे यांनी आभार प्रदर्शन केलं.

त्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रम मा.सल्लागार (कामगार)यांच्या अध्यक्षतेखाली व मा. ॲड. जगताप प्रसन्ना व मा. चरवड शैलेश, सदस्य, मनपा यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. प्रमुख पाहुणे मा. ॲड. जगताप, मा. नंदकिशोर जगताप

# जगदीश चव्हाण यांचे रंगावली प्रदर्शन



**श्री. जगदीश चव्हाण यांनी काढलेली रंगावली झाशीची राणी लक्ष्मीबाई**

रंगावलीकार श्री. जगदीश चव्हाण, सहाय्यक अभियंता यांचे या वर्षीच्या गणेशोत्सवातील १२ वे प्रदर्शन संपन्न झाले. आजपर्यंत शिवदर्शन, उत्तुंग, भारतरत्न, विविधा, बालमुद्रा, महाराष्ट्रभूषण, हसरी रंगावली, रांगोळीत सजले रामायण, महाभारत, इत्यादी प्रदर्शने रांगोळीच्या माध्यमातून त्यांनी साकारली आहेत.

यावर्षी १८५७ चे स्वातंत्र्यसमर या विशेष प्रदर्शनात स्वातंत्र्यवीर व क्रांतीवीरांची रांगोळी चित्रे तसेच इंग्रजांच्या जुलमी अत्याचाराचेही तोफेच्या तोंडी हे चित्र प्रदर्शनात होते.प्रदर्शनाचे उद्घाटन गोवा मुक्ती आंदोलनकर्ते पद्मश्री मोहन रानडे यांच्या हस्ते झाले.

यावेळी सुप्रसिध्द सतारवादक उस्ताद उस्मानखाँ व डॉ. सतेज जानोरकर, हृदयरोगतज्ञ यांची विशेष उपस्थिती होती. पुणेकर नागरिक, मनपा अधिकारी/कर्मचारी व विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास प्रचंड प्रतिसाद दिला.

## मनन आणि चिंतन

- ध्येयाचा नंदादीप अखंड तेवत ठेवा म्हणजे कर्तुत्वाचा प्रकाश पडेल.
- समुद्रातील तूफानापेक्षा मनातील वादळे अधिक भयानक असतात.
- भुतकाळासाठी रडण्यापेक्षा वर्तमानकाळाशी लढण्यात आणि भविष्याच्या शिखरावर चढण्यातच खरा पराक्रम आहे.
- चुकांची भीती बाळगू नका, कारण कोणीच पूर्ण नाही. पण एक चूक पुन्हा करु नका.
- कोणतेही बोधवाक्य संपूर्ण सत्य सांगूच शकत नाही, कारण संपूर्ण सत्य हे अभिव्यक्तीपेक्षा, अनुभूतीशीच निगडित आहे.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका रौप्य महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त आंतरमहानगरपालिका क्रिडा स्पर्धा संपन्न



मा. डॉ. वैशाली घोडेकर, महापौर, पिंपरी चिंचवड मनपा यांच्या हस्ते हॉलीबॉल सामन्याचे उपविजेतेपद स्विकारताना पुणे मनपा संघाचा कॅप्टन श्री. प्रसाद वाळुंजकर, समवेत पदाधिकारी व अन्य खेळाडू

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रौप्य महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त निमंत्रित आंतरमहानगरपालिकांच्या विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन दिनांक ३/१०/०७ ते ६/१०/०७ या कालावधीमध्ये अण्णासाहेब मगर स्टेडियम, पिंपरी येथे आयोजित केल्या होत्या. या स्पर्धांमध्ये मुंबई, पुणे, सोलापूर, औरंगाबाद व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने भाग घेतला होता. पुणे महानगरपालिकेने क्रिकेट, व्हॉलिबॉल, लॉन टेनिस, टेबल टेनिस, बुध्दिबळ व कॅरम या क्रिडा प्रकारांमध्ये भाग घेतला होता.

पुणे महानगरपालिकेतर्फे या वेळी सर्व क्रिडा प्रकारांमध्ये एकूण ५५ सेवकांचा समावेश होता. या संघामध्ये ५१ पुरुष सेवक व ४ महिला सेवकांचा सहभाग होता.मा. प्रविणसिंह परदेशी, महापालिका आयुक्त व मा. कुंडलिक कारकर, आयातकर प्रमुख यांनी या स्पर्धांमध्ये भाग घेतलेला होता. पुणे मनपाने विविध क्रिडा प्रकारांमध्ये खालीलप्रमाणे यश प्राप्त केले.

क्रिकेट - अंतिम सामना मुंबई महानगरपालिका विरुध्द पुणे महानगरपालिका यांच्यात झाला. २०-२० च्या क्रिकेट स्पर्धेमध्ये मुंबई महानगरपालिकेने २० षटकांत ९ बाद ११५ धावा व पुणे महानगरपालिकेच्या २० षटकांत ९ बाद १०९ धावा झाल्या. मुंबई महानगरपालिकेला विजेतेपद व उपविजेतेपद पुणे महानगरपालिकेला प्राप्त झाले.

व्हॉलिबॉल - मुंबई महानगरपालिका विरुध्द पुणे महानगरपालिका यांच्यात अंतिम सामना झाला. मुंबई महानगरपालिका २५-२३, २५-१७ अशा गुणांनी सामना जिंकला व उपविजेतेपद पुणे मनपास मिळाले.

लॉन टेनिस एकेरी- मा.श्री. कुंडलिक कारकर, आयातकर प्रमुख, पुणे महानगरपालिका विरुध्द श्री. प्रविण गोडे, उप अभियंता, पिंपरी चिंचवड मनपा यांच्यात अंतिम सामना झाला. मा. कारकर हे विजयी झाले.

लॉन टेनिस दुहेरी - मा. दिलीप बंड, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मा. अजीज कार्चे, महाव्यवस्थापक, पीसीएमटी विरुध्द मा. प्रविणसिंह परदेशी, आयुक्त, पुणे महानगरपालिका व मा. कुंडलिक कारकर, आयातकर प्रमुख, पुणे मनपा यांच्यात ही लढत झाली. या स्पर्धेत पिंपरी चिंचवड विजयी झाली व पुणे मनपास उप विजेतेपद मिळाले.

टेबल टेनिस एकेरी व दुहेरी - मुंबई महानगरपालिका व पुणे महानगरपालिका यांच्यात सामना होवून मुंबई महानगरपालिका विजयी झाली तर पुणे महानगरपालिकेस उपविजेतेपद मिळाले. याशिवाय क्रिकेट स्पर्धेचा मानकरी म्हणून पुणे महानगरपालिकेचा श्री. लक्ष्मीकांत शिंदे, सुरक्षा विभाग तर सर्वोत्कृष्ट गोलंदाजीचा मान श्री. निलेश चव्हाण, आरोग्य खाते यांना जाहीर झाला.सर्व स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ प्रा. रामकृष्ण मोरे सभागृह, चिंचवड येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर डॉ. वैशाली घोडेकर यांच्या हस्ते दि.६/१०/०७ रोजी सायं. ७ वा. संपन्न झाला.या समारंभात पुणे महानगरपालिकेचे श्री. सुभाष पुरी, व्यवस्थापक, पं. नेहरु स्टेडियम यांचा विशेष सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला.या कार्यक्रमास मा. कुंडलिक कारकर, आयातकर प्रमुख, पुणे मनपा, मनपाचे सर्व खेळाडू व सेवक उपस्थित होते.

●●●

# कामगार प्रशिक्षण वर्ग क्र. ६९-७० चा उद्घाटन समारंभ



उद्घाटन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे डॉ. सी.एम. चितळे व डॉ. पी. पी. जोशी यांचेसमवेत मा. नंदकिशोर जगताप, श्री. शिवाजी दौंडकर व श्री. पांडुरंग सावंत

कामगार प्रशिक्षण वर्ग क्र. ६९ व ७० चे उद्घाटन डॉ. (कॅ) सी.एम.चितळे, अधिष्ठाता, व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा, पुणे विद्यापीठ यांच्या शुभ हस्ते व मा. डॉ. पी.पी.जोशी, विभागीय संचालक, कामगार शिक्षण मंडळ यांच्या उपस्थितीत झाले. डॉ. (कॅ) चितळे यांनी महापालिकेतील सर्व सेवक/अधिकाऱ्यांनी चार H चे सूत्र विषद केले. या सूत्रामध्ये पहिला H = Head, दूसरा H= Heart, तिसरा H = Hand Skill, चौथा H = Health याचा प्रशिक्षणार्थींनी सातत्याने विचार करुन आपल्या कामामध्ये त्यांचा अंतर्भाव करणे अत्यंत आवश्यक आहे, असे सांगितले तसेच पुणे महानगरपालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उपक्रमाचे विशेष कौतुक केले व उपक्रमाद्वारे मनपाच्या दैनंदिन कामात सुलभता येवून व कार्यक्षमतेत वाढ निश्चित होईल, अशी आशा व्यक्त केली.

प्रशिक्षण वर्ग क्र. ६९ मध्ये वर्गश्रेणी ४ मधील पुरुष ३२, स्त्रिया ३ असे एकूण ३५ व वर्ग क्र. ७० मध्ये वर्गश्रेणी ३ मधील पुरुष ३४, स्त्रिया ८ असे एकूण ४२ दोन्ही वर्ग मिळून ७७ सेवकांना प्रवेश देण्यात आला असून, गरजेनुरुप व सतत प्रशिक्षण योजनेंतर्गत सेवकनिहाय अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला आहे.

समारंभात डॉ. पी.पी.जोशी, विभागीय संचालक, कामगार शिक्षण मंडळ, पुणे, मा. श्री. नंदकिशोर जगताप, सल्लागार(कामगार),पुणे महानगरपालिका, मा. तुकाराम जगताप, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन, मा. पांडुरंग सावंत, सरचिटणीस, पीएमसी एम्प्लॉईज युनियन व मा. प्रकाश जाधव, कार्याध्यक्ष, पुणे मनपा कामगार युनियन यांनी कामगार प्रशिक्षण वर्गास शुभेच्छा देवून मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. मधुकर बिबवे, कामगार शिक्षक पुणे मनपा यांनी केले तर समन्वयक तथा कामगार कल्याणाधिकारी श्री. अरुण खिलारी यांनी आभार प्रदर्शन केले.

●●●

## वाचक प्रतिसाद

श्री. डांगे, शालाप्रमुख, श्री.संत नामदेव माध्यमिक विद्यालय यांचा अभिप्राय -

मनपाच्या कर्मचाऱ्यांचे मुखपत्र वर्ष १ ले अंक १ ला मिळाला. त्याबद्दल संपादक मंडळ आणि इतर सर्वांचे अभिनंदन. अंक चांगला आहे. अंक काढल्याबद्दल आणि प्रकाशन केल्याबद्दल सर्वांना धन्यवाद.

## सेवानिवृत्ती वेतन

१. सेवानिवृत्त सेवकास सेवानिवृत्ती दिनांकास त्याच्या देय रकमा व नियत दिनांकास सेवानिवृत्ती वेतन सुरु करा.

२. पुढील सहा महिन्यांत सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांची सेवापुस्तके अद्ययावत नोंदीसह तपासून घ्या.


**कल्याणवार्ता**

**ऑक्टोबर, २००७**

❖ **प्रकाशक तथा अध्यक्ष** ❖

**कामगार कल्याण निधी**

**मा. प्रविणसिंह परदेशी**

आयुक्त, पुणे महापालिका

❖ **संपादक** ❖

मा. नंदकिशोर जगताप

सल्लागार (कामगार)

❖ **कार्यकारी संपादक** ❖

लीलाधर प्र.वाबळे

कार्यालय अधिक्षक

❖ **सहाय्यक** ❖

सौ. ज्योती घरवाढवे

❖ **मुद्रक** ❖

मुद्रणमहर्षि मामाराव दाते

मुद्रणालय, मनपा, पुणे.

❖ **प्रकाशन स्थळ** ❖

पुणे महापालिका

शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.

❖ **संपर्क** ❖

सल्लागार (कामगार) कार्यालय, पुणे महानगरपालिका.

दूरध्वनी क्र. २५५० १२५५/ १२५२/१२५३

ईमेल आयडी

nandkumar.jagtap @punecorporation.org

**फक्त खाजगी वितरणासाठी**

(विनामूल्य)

...

# कल्याणवार्ता